क्रमांक : २९५९/ह-२
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
विधान भवन, मुंबई,
**दिनांक : २० फेब्रुवारी, २०२५**

# :: प रि प त्र क : :

**विषय :- मा.सदस्यांना रेल्वे प्रवासासाठी पुरविण्यात येत असलेल्या राज्यांतर्गत / राज्याबाहेरील कुपन पुस्तकांच्या वापराबाबत..**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सर्व सदस्यांना कळविण्यात येते की, मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्यांना महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (रेल्वेने विनामूल्य प्रवास) नियम, १९६५ नियम ३ मध्ये राज्यांतर्गत /राज्याबाहेरील प्रवासासाठी प्रत्येकी पाच हजार एवढे मूल्य असणाऱ्या तीन कुपन पुस्तकांचा एक संच उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांकरीता मा. सदस्यांना पुरविण्यात येत असलेल्या राज्यांतर्गत पुस्तकांचा वापर मा. सदस्यांकरीता करणे व राज्याबाहेरील पुस्तकांचा वापर मा. सदस्य स्वत: रेल्वेने महाराष्ट्र राज्याबाहेर एकटयाने आणि त्यांची पत्नी/ तिचा पती व अज्ञान मुले किंवा सोबती यासह महाराष्ट्र राज्यात किंवा महाराष्ट्र राज्याबाहेर प्रवास करतील तेव्हा करणे आवश्यक आहे.

अत: आपण राज्यांतर्गत /राज्याबाहेरील कुपन पुस्तकांचा वापर उपरोक्त तरतूदीप्रमाणे करणेबाबत दक्षता घ्यावी. अशी आपणास विनंती आहे.

(राजेश तारवी)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति : महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य.**

\\Mls-h2-06\D\D -1\2024\vasuli note\paripatrak.docx